




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com


1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक




● वर्ष : ०१ ● अंक : ३३८ ● पुणे ● बुधवार, दि. १६ ऑक्टोबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No. - MAHMAR/2023/89313





समाजहितैषी प्रतापरावांचे योगदान अतुलनीय 3





तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाची पुन्हा एकदा गरज आहे 4








# विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला

## राज्यात आचारसंहिता लागू

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील विधानसभा निवडणुकीची मंगळवारी निवडणूक आयोगाकडून घोषणा करण्यात आली. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून दुपारी 3.30 वाजता दिल्लीत पत्रकार परिषद घेत झारखंड आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले. महाराष्ट्रातील निवडणूक पहिल्या टप्प्यात होणार आहे. येत्या 20 नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक पार पडणार आहे. तर 23 नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे निकाल घोषित होतील. केंद्रीय निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत याबद्दलची मोठी घोषणा केली आहे. विधानसभा निवडणुकांची घोषणा होताच महाराष्ट्रात आचारसंहिताही लागू झाली आहे. सातारा जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदार संघात निवडणूक आयोगाकडून आचार संहितेची घोषणा होण्यापूर्वीपासूनच घडामोडींना वेग आला आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत सातारा जिल्ह्यात पहायला मिळणार आली तरी वंचित बहुजन आघाडीकडून देखील जिल्ह्यातील उमेदवाराची घोषणा करण्यात आली आहे. विधानसभेचा बिगुल वाजला असला तरी सातारा विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीची तयारी पूर्ण झाली आहे. मतदारसंघाची मतमोजणी डिस्ट्रिक मार्केटिंग फेडरेशनच्या गोडावूनमध्ये होणार असल्याचे निश्चित झाले आहे. या निवडणुकीत सातारा आणि जावली तालुक्यांतील 464 मतदान केंद्रांवर सुमारे 3 लाख 41 हजार 833 मतदार हक्क बजावणार आहेत. या निवडणुकीसाठी सुमारे 3 हजार 600 कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.



### असा आहे विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम

विधानसभेच्या निवडणुकीसाठी अर्ज करण्याची तारीख ही 22 ऑक्टोबरपासून सुरु होईल. उमेदवार 29 ऑक्टोबरपर्यंत आपला अर्ज दाखल करु शकणार आहेत. यानंतर 30 ऑक्टोबरला सर्व उमेदवारांच्या अर्जाची छाननी होईल. तर 4 नोव्हेंबर 2024 ला पर्यंत उमेदवार आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊ शकणार आहेत, अशी माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली आहे. 25 नोव्हेंबरपर्यंत निवडणुकीचा कार्यक्रम पूर्ण होणार आहे

## मोबाइलवरील मालिका बंद केल्याने मुलाकडून आईवर हल्ला

- घरातील खिडकीच्या काचा फोडल्या; धनकवडीतील घटना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मोबाइलवरील मालिका बंद केल्याने अल्पवयीनाने आईवर कात्रीने वार करण्याचा प्रयत्न केला. मुलाने घरातील खिडकीच्या काचा फोडून आईला मारहाण केल्याची धक्कादायक घटना धनकवडी भागात घडली. याप्रकरणी अल्पवयीनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत त्याच्या आईने सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला धनकवडी भागात राहायला आहे. सोमवारी रात्री उशीरापर्यंत मुलगा मोबाइलवरील मालिका पाहत होता. त्यावेळी आईने जास्त वेळ मोबाइलवरील मालिका पाहू नको, असे सांगितले. त्यानंतर तो मालिका पाहत होता. त्यामुळे आईने त्याच्या हातातून मोबाइल संच हिसकावून घेतला आणि मालिका बंद केली. आईने मोबाइल संच हिसकावून घेतल्याने मुलगा चिडला. त्याने थेट आईला मारहाण करण्यास सुरुवात केली. घरातील लाकडी फ्रेम फोडली, तसेच कात्रीने आईवर वार करण्याचा प्रयत्न केला. आईला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून घरातील खिडकीच्या काचा फोडल्या. घाबरलेल्या आईने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलीस उपनिरीक्षक काळे यांनी घटनास्थळी भेट दिली. हवालदार जाधव तपास करत आहेत. सातत्याने मोबाइल पाहणे, मोबाइलवरील मारहाणीचे चित्रपट, हिंसक घटनांच्या चित्रफिती, गुन्हेगारांच्या चित्रफिती पाहून अनेक अल्पवयीन गुन्हेगारीकडे वळतात. गुन्हेगारीविषयी वाटणाऱ्या आकर्षणामुळे मुले वाईट गोष्टींकडे वळतात. अनेक गंभीर गुन्ह्यात अल्पवयीन सामील होतात. अल्पवयीनांचा गुन्हेगारीकडे वाढणारा कल चिंतेची बाब आहे. मुलांमधील गुन्हेगारी रोखणे, तसेच त्यांना गुन्हेगारी मार्गावर न जाऊ देण्यासाठी पोलिसांकडून समुपदेशन करण्यात येत आहे. गुन्हेगारीकडे वळणारी मुले, त्यांच्या पालकांचे स्वयंसेवी संस्थेतील तज्ज्ञांकडून समुपदेशन करण्यात येत आहे.















# अन्नाचा एक-एक-कण वाचविण्याची गरज

विश्व खाद्य दिवस कृतीत बदलायला पाहिजे तेव्हाच जगातील "उपासमारी" संपुष्टात येईल.खाद्यांन्नाची समस्या पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने 16 आक्टोंबर 1945 ला "खाद्य व कृषि संघटन" ( एफएओ ) ची स्थापणा केली."कॉफ्रेस ऑफ द फूड एंड एग्रीकल्चर ऑर्गनाइजेश"(एफएओ) ने 16 आक्टोंबर 1979 पासून "विश्व खाद्य दिवस"साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासुन जगात "आंतरराष्ट्रीय विश्व खाद्य दिवस" साजरा केल्या जातो.या दिवसांचा उद्देश म्हणजे जगातील वाढती भुकमरीची(उपासमारी) समस्यांच्या प्रती लोकांना जागरुक करने.उपासमारी, कुपोषण व गरीबीच्या विरुद्ध संघर्षाला मजबुती प्रदान करने.उपासमारीच्या समस्येकरीता संपूर्ण जग संघर्ष करीत आहे व उपासमारी, कुपोषण यातुन बाहेर निघण्यासाठी सर्वांचा संघर्ष सुरु आहे. भारताची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत आहे. परंतु आजही कोट्यवधी भारतीयांची भूक भागत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.तर भारताचे एक चीत्र असेही आहे की गोडाऊनमध्ये करोडोंटन अन्न-धान्य सडत आहे.विश्व खाद्य दिवस साजरा करण्याचा उद्देश म्हणजे जगातील उपासमारी (भुकमरी) संपुष्टात आणणे. परंतु जगाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की,या कार्यक्रमाच्या इतके वर्षानंतरही सुध्दा आजही जगातील करोडो लोकांना आम्ही दोन वेळचे जेवण सुध्दा देवु शकत नाही हे जगाचे दुर्भाग्यिच म्हणावे लागेल."अन्न हे पुर्ण ब्रम्ह" म्हटल्या जाते.कारण अन्नाशिवाय कोणीही जगु शकत नाही. मानव, जीवजंतू वन्यप्राणी जंगल संपदा यांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते. त्यामुळे अन्नाच्या नासाडीबाबत जागरुकता आवश्यक आहे. अन्न-धान्य पिकवीण्याकरीता पाण्याची आवश्यकता असते. त्याचबरोर सजीव व निर्जीव या दोन्ही घटकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असते.त्यामुळे अन्नाची संपूर्ण प्रक्रिया पाण्यावर अवलंबून असते. अन्न-धान्याला जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा जास्त महत्व पाण्यालासुध्दा आहे.कारण पाणी रहाले तरच अन्नाचे उत्पादन होवु शकते.16 आक्टोंबर संपूर्ण जग "विश्व खाद्य दिवस"म्हणुन साजरा करतात.कारण खाद्यांनाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. आज जगातील प्रत्येक व्यक्ती रोजगार मीळवीण्यासाठी का?धावपळ करतो?, मोल-मजुर, कामगारांना काम मिळावे म्हणून का धावपळ करतो? यामागे एकच उद्देश असतो "वितभर पोटाची खळगी भरणे" कारण काहीना काम मिळाले नाही तर उपाशीपोटी राहावे लागते हे सुद्धा अर्धसत्य आहे याला नाकारता येत नाही. करोणा काळात जगातील अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या ओढावली होती.कारण या काळात करोडो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला होता.त्यामुळे भारतासह अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या दिसून आली.या उपासमारीच्या संकटात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागले.अशाप्रकारचे उग्ररुप करोणा काळात दीसुन आले. जगात खाद्यांन्नाला कुठेही तडा जाऊ नये याकरिता शेतकरी वर्ग आपल्या अंगातुन घाम गाळतो व शेती पिकवितो. तेव्हाच देशासह जगातील लोकांच्या "पोटाची खळगी" भरते. म्हणुनच शेतकऱ्यांना "अन्नदाता" म्हणुन संबोधल्या जाते. शेतकऱ्यांनी जर अन्न पिकवीले नाही तर संपूर्ण जनतेवर उपाशी मरण्याची पाळी येवु शकते.परंतु मानवजातीला जिवीत ठेवण्याचे दायीत्व व जबाबदारी शेतकऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे सर्वप्रथम 16 आक्टोंबर विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने संपूर्ण शेतकरी बांधवांना मी "शतशत प्रणाम" करतो. कारण उन, पाऊस,थंडी,ओला दुष्काळ,कोरडा दुष्काळ, सुनामी आणि अकाल यांच्याशी संघर्ष करून शेतकरी शेतीतुन उत्पन्न काढत असतो.भारताला शेतकऱ्यांचा राजा संबोधल्या जाते म्हणजेच "कृषिप्रधान देश"परंतु गेल्या 77 वर्षांपासून आजही भारतीय शेतकरी दु:खी असल्याचे दिसून येते.कारण आजही शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला सरकार कडून योग्य भाव मिळत नाही.सरकारकडुन बाजार समिती किंवा मंडीमध्ये योग्य भावाची घोषणा केली जात नाही.त्यामुळे भारतीय शेतकरी नाराज असल्याचे दिसून येते.आज शेतकऱ्यांचा विचार केला तर मनाने व स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून करोडपती आहे. परंतु "आर्थिकदृष्ट्या कंगाल" आहे. कारण भारतात शेतकऱ्यांचे रक्त पिण्याचे काम दलाल,व्यापारी व राजकीय पुढारी वर्ग नेहमीच करतांना दिसतात.आज व्यापाऱ्याजवळ, राजकीय पुढाऱ्यांजवळ चारचाकी गाडी, बंगला,सोने-नाने,चल-अचल संपत्ती व अवैध संपत्ती दिसून येते हे आले कोठून? भारतातील शेतकरी राबराब राबतो परंतु आताही त्यांच्या नशिबी "भोपळा" आल्याचे दिसून येते.कारण कोणतीही सरकार असो ती पुर्णपणे व्यापाऱ्यांच्या व पुंजीपती यांच्या पाठीशी असल्याचे गेल्या 77 वर्षांपासून आपण पहात आहोत.त्यामुळे आज शेतकरी वर्ग मागासलेला आहे.भारत स्वतंत्र झाल्यानंतर ही भारतीय शेतकऱ्यांनी जनतेला अन्न-धान्याची कमतरता पडू दिली नाही.परंतु चीनमध्ये 1970 मध्ये भुकमरीची महाभयानक लाट आली अशा परीस्थितीत चीनजवळ खायला अन्न-धान्य नव्हते.म्हणुन त्यांनी अन्न-धान्याऐवजी कुत्रे, मांजर, पाल, साप,कीडे-माकोडे व अन्य प्राणी खायला सुरुवात केली. चीनची ही भयावह स्थिती पहाता चीन सरकारने प्रतीबंधीत प्राण्यांना जनतेला नेहमी करीता खाण्याची परवानगी दिली. अशा कठीण परिस्थितीतुन जावुनसुध्दा आज चीन बलाढ्य देश बनला आहे.याचे संपूर्ण चीत्र आपल्याला वुहान प्रांतातुन दीसुन आले. परंतु भारतीय शेतकऱ्यांनी स्वतंत्र पुर्वकाळात व स्वतंत्र्यानंतरसुध्दा भारत वासीयांना अन्नची कमी पडु दीली नाही ही भारतीय शेतकऱ्यांची महानता आहे. परंतु सरकारच्या अन्न-धान्य साठ्याचे नियोजन गोडाऊन यांच्या कमतरतेमुळे दरवर्षी करोडो टन अन्नधान्य सडत असते आणि यातुनच उत्पन्न होते भुकमरी (उपासमारी)ची सुरुवात.आजही भारतात मेळघाट सारख्या व अतिदुर्गम अनेक भागात भुकमरी व कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते असे का?याचा अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करण्याची गरज आहे. आज भारतात उलटी गंगा वाहतांना दीसते देशातील 60 टक्के शेतकऱ्यांकडे करोडो रुपयांची शेती आहे. परंतु आजही भारतीय शेतकरी गरीब आहे. याचे मुख्य कारण म्हणजे राजकीय पुढाऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी आतापर्यंत शेतकऱ्यांचे फक्त रक्त पिण्याचे काम केल्याचे दिसून येते.त्यामुळेच आज भारतात अनेक भागातील अन्नदाता शेतकरी आत्महत्यां करतांना दिसतो. कारण त्यांची संपूर्ण शेती निसर्गावर अवलंबून असते.आतातर वातावरणातील बदलाने शेतकऱ्यांना अत्यंत कठीण परिस्थितीत आनुण ठेवले आहे.विश्न खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकरी सरकारला विचारते की मुठभर नगरसेवक, आजी-माजी आमदार- खासदार व मंत्री मेहनत न करता पाच वर्षांत करोडपती व अरबोपती कसेकाय होतात? राजकीय पुढारी शेतकऱ्यांपेक्षा एवढा मोठा आहे का?की त्याला गलेलठ्ठ पगार, पेन्शन,इतर भत्ते सरकार देते व शेतकऱ्यांना भोपळा देते.हे लोकशाहीच्या देशात चालय्य तरी काय?सर्व राजकीय पुढारी सांगतात की आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत. समान अधिकार,समान न्याय असे खोकले आश्वासन देतात. परंतु आजच्या परिस्थितीत राजकीय पुढारीच शेतकऱ्यांचा घात करतांना दिसत आहे.त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या प्रती जागरुकता दाखवुन विश्र्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत केली पाहिजे.आंतरराष्ट्री माहिती नुसार जगात "उपाश्यापोटी" झोपणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे सांगण्यात येत आहे.संयुक्तराष्ट्र खाद्य आणि कृषिसंघटना नुसार 2002 च्या तुलनेत खाद्यान्नवस्तुच्या किंमतीत 140 टक्याने भारीभरकम वाढ झाली आहे.यामुळे डिसेंबर 2007 पासुन 40 देशांना खाद्यांन्न संकटाचा सामना करावा लागत होता. सध्या गेल्या अडीच वर्षांपासून सुरु असलेले रशिया-युक्रेन युद्ध भयावह स्थितीमध्ये आहे आणि आणि आता अचानक इजरायल-हमास-हिज्बुल्ला-इराण यांचा संघर्ष टोकाला पोहोचला आहे. यामुळे युध्दाचा भडका महाभयानक स्थितीत आहे.याचा परिणाम अन्नसाठ्यावर होवून अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे व पुढे आणखी भयावह होऊ शकते."भारतीय खाद्य निगमने" स्वत: कबुल केले आहे की दरवर्षी गोदामातील 50 करोड रुपयांचा अनाज म्हणजे 10.40 लाख मीट्रिक टन पर्यंत अनाज सडतो किंवा खराब होतो. हीबाब कृषी प्रधान देशाच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर, दु:खद व चिंतेची आहे.कारण खराब होणारे अन्न-धान्य प्रत्येकवर्षी सव्वा करोड लोकांची भुक मीटवु शकते. परंतु भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की शेतकऱ्यांनी मेहनतीने तयार केलेला लाखो टन अनाज सडतो आणि यामुळेच भुकमरीची समस्या उद्‌भवत आहे याला नाकारता येत नाही. यामुळेच भारतात करोडो लोक उपाश्यापोटी झोपतांना दीसतात.भारताची हेही समस्या आहे की सहा वर्षांखालील 47 टक्के मुले कुपोषणाची शीकार होत आहे.एफएओच्या माहिती नुसार भारतात 2008 मध्ये 20 करोड 10 लाख लोक भुकमरीचा सामना करीत होते.ग्लोबल हंगरच्या इंडेक्सने जारी केलेल्या 2023 च्या आकडेवारीनुसार भारताचा विश्र्व भुकमरी सुचकांकमध्ये 125 देशांच्या तुलनेत 111 वा नंबर लागतो ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे.या उलट भारताच्या शेजारील देशांचा विचार केला तर त्यांची परिस्थिती भारतापेक्षा चांगली आहे यात पाकिस्तान-102, बांगलादेश-81, नेपाळ-69, श्रीलंका -60 व्या स्थानावर आहे.गेल्या काही महिन्यांपासून देशातील 20 कोटी लोकांना मोफत अन्न-धान्याची "प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना"असतांना सुध्दा भुकबळीची संख्या वाढत आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. भारतात सर्वेमध्ये हेही लक्षात आले की लग्नसमारंभ, महाप्रसाद व अन्य जेवणाच्या कार्यक्रमात हजारो टन खाद्यान्न वाया जाते.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे.आजच्या परीस्थितीत अन्नाचा प्रत्येक कन वाचवीण्याची गरज आहे.आज अन्नाचा प्रत्येक दाना महत्वाचा आहे. तेव्हाच म्हणतात "दाने दाने पे लिखाण है, खाने वाले का नाम" या म्हणीची पुर्तत: होवु शकते.आज 140 कोटी जनतेचे दायीत्व बनते की अन्नाचा प्रत्येक कण वाचवुन देशातील उपासमारी व कुपोषण यावर अंकुश लावला पाहिजे.विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने मी 140 कोटी जनतेला विनंती करतो की "अन्नाचा एक-एक कण वाचवीण्याची नीतांत गरज आहे.कारण देशातील वाढती लोकसंख्या व जगातील युद्धजन्य परिस्थिती पहाता अन्न-धान्याचे जतन करने अत्यंत गरजेचे आहे.कारण भारतात बालकांच्या कुपोषणाची स्थिती अत्यंत वाईट आहे. त्याचप्रमाणे मी सरकारला आग्रह करतो की अन्न-धान्याचा काळाबाजार ताबडतोब रोखला पाहिजे व जमाखोरांच्या प्रती कठोर पाऊल उचलुन त्यांच्या मुसक्या आवरल्या पाहिजे.तेव्हाच विश्र्व खाद्य दिवसाला खरे महत्व येईल.संपुर्ण जग एकीकडे खाद्यांनासाठी आठा-पीटा करून वन-वन हिंडत आहे तर दुसरीकडे संपूर्ण जग युद्धाच्या उंबरठ्यावर येऊन बारुदच्या ढीगाऱ्यावर बसल्याचे दिसून येते.म्हणजेच आज जगात खाद्यान्ना पेक्षा दारुगोळ्याला जास्त महत्व दील्याजात आहे.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवू शकतो.याकरिता जीवन जगण्यासाठी खाद्यांनाकडे प्रत्येक देशांनी तत्परता दाखवुन उपासमारी, कुपोषण,भुकमरी याला पुर्णविराम लावण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले पाहिजे यातच जगाचे कल्याण आहे.

*'एसटी' आरक्षण अंमलबजावणीच्या 'जीआर'साठी*

## सकल धनगर समाजातर्फे ढोल वादन आंदोलन

- ...तर धनगर समाज महायुती सरकारचे दहन करणार : ॲड. विजय गोफणे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धनगर समाजाच्या हक्काचे अनुसूचित जमातीचे (एसटी) आरक्षण तातडीने लागू करण्याचा शासन निर्णय उद्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत काढावा, या मागणीसाठी सकल धनगर समाजातर्फे रविवारी पुण्यात ढोल वादन आंदोलन करण्यात आले.

सारसबागजवळील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुतळ्याला अभिवादन करून धनगर समाजबांधवांनी एसटी आरक्षण लागू करण्याची मागणी केली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा निर्णय घेतला नाही, तर उग्र स्वभावाचा धनगर समाज महायुती सरकारचे दहन केल्याशिवाय राहणार नाही, असा सूचक इशारा समन्वयक ॲड. विजय गोफणे यांनी दिला.

ॲड. विजय गोफणे म्हणाले, "राज्यघटनेने धनगरांना एसटी प्रवर्गात आरक्षण दिलेले आहे. मात्र, राज्य सरकारकडून त्याची अंमलबजावणी केली जात नाही. आजवर अनेकदा धनगर समाजाची फसवणूक झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शब्दाला जगणारे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून आम्हाला अपेक्षा आहे. त्यामुळे उद्याच्या मंत्रिमंडळ बैठकीचे यासंदर्भातील शासन निर्णय काढून मुख्यमंत्र्यांनी धनगर समाजाला दिलेला शब्द खरा करावा. तसे झाले, तर येत्या निवडणुकीत राज्यातील दोन कोटी धनगर समाज त्यांच्या पाठीशी राहील.""आचारसंहिता लागण्यापूर्वी महायुती सरकारने हा निर्णय घेतला नाही, तर विधानसभा निवडणुकीत धनगर समाज आपली ताकद दाखवून देईल. राज्यातील ८० ते ९० मतदारसंघात धनगर समाजाची निर्णायक भूमिका राहणार आहे. तर ७० ते ८० मतदारसंघात ५० ते ६० हजारांचे मतदान धनगर समाजाचे आहे. त्यामुळे महायुती सरकारने धनगर समाजाचा पाठिंबा मिळवायचा, की समाजाचा रोष ओढवून घ्यायचा, हे मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व मंत्रिमंडळाने ठरवावे," असे गोफणे म्हणाले.

पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरातील शेकडो धनगर बांधव, भगिनी यामध्ये सहभागी झाले होते. ॲड. विजय गोफणे, सोमनाथ देवकाते, अनिकेत कवाने, डी. बी. नाईक, मधुसूदन बरकडे, योगेश खरात, महादेव वाघमोडे, विष्णुदास गावडे, सुनंदा गडदे, पिंटू कोकरे, भरत गुरव, डॉ. सुधाकर न्हाळदे, खंडू तांबडे यासह अन्य धनगर बांधव उपस्थित होते.

## मानसिक आरोग्याच्या जनजागृतीसाठी पुण्यात 'वॉकेथॉन'

### जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त 'कनेक्टिंग ट्रस्ट'तर्फे आयोजन; दोनशे स्वयंसेवकांचा सहभाग

**पुणे - लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यास प्रोत्साहन देण्यासह मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी रविवारी वॉकेथॉनचे आयोजन केले होते. जंगली महाराज रस्त्यावरील संभाजी पार्कपासून निघून जंगली महाराज रोड, गुडलक चौक, फर्ग्युसन महाविद्यालय, शिरोळे रस्तामार्गे संभाजी पार्क अशी ही वॉकेथॉन झाली. जागतिक मानसिक आरोग्य दिनाची यंदाची संकल्पना 'कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्याला प्राधान्य' अशी आहे. जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त कनेक्टिंग ट्रस्टतर्फे आयोजित वॉकेथॉनला कनेक्टिंग ट्रस्टच्या संस्थापिका व व्यवस्थापकीय संचालक अर्णवाज दमानिया यांच्या हस्ते ध्वज दाखवून सुरुवात झाली. प्रसंगी सहसंस्थापक सँडी डायस, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रणिता मडकईकर, शिल्पा तांबे आदी उपस्थित होते. जागरूक पुणेकरांसह दोनशेपेक्षा अधिक स्वयंसेवक यामध्ये सहभागी झाले. जनजागृतीपर विविध फलक हातात घेऊन, मानसिक आरोग्य जपण्याच्या घोषणा देत स्वयंसेवकांनी जनजागृती केली.

प्रसंगी अर्णवाज दमानिया म्हणाल्या, "कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्याला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. हीच गरज ओळखून कनेक्टिंग ट्रस्टने या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी वॉकेथॉनचे आयोजन केले आहे. प्रत्येकाने आपल्या मानसिक आरोग्याविषयी सजग राहायला हवे. आत्महत्या प्रतिबंध आणि आत्महत्येला कलंकमुक्त करण्यासाठी कनेक्टींग ट्रस्ट गेली 20 वर्षे समर्पित भावनेने कार्यरत आहे."




प्रणिता मडकईकर म्हणाल्या, "मानसिक आरोग्याविषयी अभ्यासातून कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी अधोरेखित झाली आहे. कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांवर होत असलेला परिणाम अभ्यासकांनी मांडला आहे. 'आयपीएसओएस'च्या अभ्यासात दोनपैकी एका कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांना मानसिक आरोग्य बिघडण्याचा धोका आढळला आहे. 35-45 वयोगटातील लोक, महिला आणि उच्च पदावरील कर्मचारी यांचा समावेश सर्वाधिक धोका असलेल्यांमध्ये होतो. आठवड्याला 45 तासांपेक्षा जास्त काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचाही या गटात समावेश आहे. या अभ्यासात 90 टक्के कर्मचाऱ्यांनी नोकरी व व्यक्तिगत जीवन यांचे संतुलन हा मानसिक आरोग्यावर परिणाम करणारा सर्वोच्च घटक असल्याचे नमूद केले आहे. 42 टक्के लोकांनी त्यांच्या नोकरीमुळे तणावग्रस्त असल्याचे मान्य केले. जवळजवळ 45 टक्के लोकांनी कामाच्या ताणामुळे त्यांच्या कौटुंबिक जीवनावर परिणाम झाला आहे, असे सांगितले. 80 टक्के लोकांनी गेल्या वर्षी तणाव, चिंता, बिघडलेले मानसिक आरोग्य यामुळे कामावरुन दोन आठवड्यांची रजा घेतल्याचे कबुल केले. 90 टक्के लोकांच्या मते प्रत्येकवेळी रजेवर असताना त्यांच्याकडून कामाची अपेक्षा केली जात असून, हे चिंताजनक आहे." कनेक्टिंग ट्रस्ट विविध कार्यक्रमांद्वारे हजारो लोकांना मदत करत आहे. यात हायस्कूल-कॉलेजेसमध्ये पीअर सपोर्ट तयार करणे, मोफत हेल्पलाइन, ईमेल सपोर्ट, सुसाईड सर्व्हायव्हर सपोर्ट आणि कनेक्टिंग संस्थेमध्ये प्रत्यक्ष भेटूनही संवाद साधता येतो ह्या विनामूल्य सेवांचा समावेश आहे, असे शिल्पा तांबे यांनी सांगितले.

## थोडक्यात




### 'क्वेंच' या ब्रँडने नवीन कल्पक उत्पादने बाजारात केली दाखल

**पुणे (आरंभ पर्व) :** विशेषतः भारतीयांच्या त्वचेसाठी कोरियामध्ये निर्मिती केलेल्या 'क्वेंच' या कोरियन स्किनकेअर ब्रँडने नवीन कल्पक उत्पादने बाजारात दाखल केली आहेत. '96 टक्के स्नेल म्युसिन कोलेजन बूस्ट सीरम' आणि '92 टक्के स्नेल म्युसिन कोलेजन बूस्ट मॉइश्चरायझर' अशी ही दोन उत्पादने असून, ती 96 टक्के अस्सल स्नेल म्युसिन (गोगलगायीपासून बाहेर पडणारा चिकट पदार्थ अर्थात श्लेष्मा) आणि शक्तिशाली घटकापासून तयार केली आहेत. ज्यामुळे चेहऱ्यावर 72 तास टिकणारी चमक प्राप्त होते. नियासिनामाइड आणि हायलुरोनिक ॲसिड यासारख्या शक्तिशाली सक्रिय घटकांसह, अधिभरण (सुपरचार्ज) केलेले सूत्र चेहऱ्यावरील गडद डाग कमी करते, जळजळ दूर करते आणि त्वचा नितळ आणि स्वच्छ बनवते. अनोख्या आणि अतिहलक्या सूत्रांसह तुमच्या त्वचेची काळजी घ्या, जे वैविध्यपूर्ण भारतीय हवामानाशी जुळवून घेण्यासाठी खास डिझाइन केले आहेत. तसेच ते कोणतेही स्निग्ध किंवा चिकट भाग न सोडता चेहऱ्यावर तत्काळ शोषून घेते. प्रत्येकासाठी दृश्यमान परिणाम आणि दीर्घकालीन फायदे वितरीत करून, भारतीयांच्या त्वचेसाठी कोरियन स्किनकेअर तंत्रज्ञानाचे मिश्रण याद्वारे उपलब्ध झाले आहे.

### उपवासाचे नवीन उत्पादने सादर




**पुणे (आरंभ पर्व) :** मालपाणीज् बेकलाईट या विश्वासप्राप्त फूड ब्रँडने नवरात्रोत्सवाचा शुभ मुहूर्त साधून उपवासाचे तीन उत्पादने सादर करण्याची घोषणा केली. उत्पादनांच्या या नव्या श्रेणीमध्ये बटाटा चिवडा (हिरवी मिरची), बटाटा चिवडा (लाल मिरची) आणि साबुदाणा चिवडा यांचा समावेश आहे. मालपाणीज् बेकलाईटमध्ये रोजच्या फराळासाठी खास तयार केलेला उपवास चिवडा आहे. शुद्ध शाकाहारी कारखान्यात ते बनविले जातात, सोयीस्करपणे पॅक केले जातात, त्यात ताजेपणा आणि कुरकुरीतपणा टिकवून ठेवला जातो. काळे मीठ वापरून ते तयार केले जातात, ते पचायला हलके आणि कमी तेलकट असतात. गोड आणि तिखट यांचे मिश्रण असलेला हा बटाट्याचा किस चिवडा कुरकुरीत बटाट्याचा किस आणि शेंगदाणे घालून तयार करण्यात येतो. हिरवी मिरची, पिठीसाखर आणि काळे मीठ, पेरलेला हा कोणत्याही वेळी चालणारा उपवासाचा नाश्ता आहे. उपवासाच्या वेळी चविष्ट खाण्याची इच्छा होते तेव्हा सतत खावा असा हा साबुदाणा चिवड्याचा फराळ आहे. हलक्या आणि कुरकुरीत साबुदाणा आणि कुरकुरीत बटाट्याचा कीस वापरून चिवडा तयार केला जातो., ज्यामुळे चिवड्याची चव वाढते. लाल मिरची बटाटा चिवडा हा एक तिखट चिवडा असून तो कुरकुरीत बटाट्याच्या कीस आणि शेंगदाणे घालून बनवला जातो. त्यावर लाल मिरचीचे तिखट पेरलेले असते.

# Isuzu Motors Indiaच्या वतीने ISUZU D-MAX ॲम्ब्युलन्स लॉन्च

- AIS-125 प्रकार C स्पेसिफिकेशनची संपूर्ण बांधणी.
- सहयोग कर्ज करार अंतर्गत कर्ज बाबतीत (उदा, सह-कर्ज/ आउटसोर्सिंग)
- खालील अतिरिक्त तपशील उपलब्ध करून दिले जाऊ शकतात



**चेन्नई (दै. आरंभ पर्व)** इसुझू मोटर्स इंडियाला इसुजु डी-मॅक्स ॲम्ब्ल्यूलन्स लॉन्चविषयी घोषणा करताना अभिमान वाटतो, जी एआयएस-125 टाइप सी रुग्णवाहिकेच्या वैशिष्ट्यांनुसार पूर्णपणे तयार केली गेली आहे. ही अग्रगण्य रुग्णवाहिका ॲम्ब्ल्यूलन्स प्रकाराची अतुलनीय विश्वासार्हता, सुरक्षितता आणि आराम उपलब्ध करून करताना जलद प्रतिसाद सक्षम करण्यासाठी आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा क्षेत्रात एक नवीन मानक स्थापित करण्यासाठी तयार केली गेली आहे. आयएसयूझेडयूच्या सिद्ध तंत्रज्ञानासह आणि आरोग्य सेवा पुरवठादार गरजांची सखोल समज असलेल्या भारतासाठी तयार केलेल्या, नवीन आयएसयूझेडयू डी-मॅक्स रुग्णवाहिका 14 'बेस्ट-इन-क्लास' वैशिष्ट्यांसह देशातील 'बेसिक लाइफ सपोर्ट' रुग्णवाहिकांमध्ये नवीन युगाची सुरुवात करीत आहे.

इसुझू मोटर्स इंडिया'चे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर तोरू किशिमोटो म्हणाले, "भारतीय बाजारपेठेसाठी 14 'बेस्ट-इन-क्लास' वैशिष्ट्यांसह डिझाइन केलेले आमचे अद्वितीय उत्पादन इसुझू डी-मॅक्स रुग्णवाहिका सादर करण्यास आम्ही उत्सुक आहोत. इसुझू हा नेहमीच विश्वास आणि विश्वासार्हतेचा समानार्थी शब्द राहिला आहे. नवीन इसूझु डी-मॅक्स रुग्णवाहिका एआयएस-125 प्रकार सी रुग्णवाहिकेअंतर्गत व्याख्याबद्ध असलेल्या वैशिष्ट्यांशी सुसंगत असताना उच्च दर्जाची बांधणी आणि अतुलनीय मजबुतीची हमी देऊन ही मूल्ये पुढे नेत आहे. या लॉन्चसह, इसुझू मोटर्स इंडिया ऑटोमोटिव्ह उद्योगातील गेम चेंजर म्हणून आपले स्थान मजबूत करत आहे, भारतीय बाजारपेठेच्या अद्वितीय मागण्यांनुसार नाविन्यपूर्ण आणि अनुरूप अशी दर्जेदार उत्पादने वितरीत करीत आहे. आम्हाला विश्वास आहे की आमची 'इसुजु डी-मॅक्स रुग्णवाहिका' 'बेसिक लाइफ सपोर्ट' रुग्णवाहिका श्रेणीमध्ये एक नवीन मापदंड स्थापित करेल. ISUZU RZ4E 1.9 L 4-सिलेंडर व्हीजीएस टर्बो इंटरकोल्ड इंजिनद्वारे समर्थित आहे, ज्यामध्ये फ्लॅट पीक टॉर्क कर्व्ह आहे, जे 120 किलोवॅट @3600 आरपीएमची 'बेस्ट-इन-क्लास' पॉवर आणि 360 एनएम @2000-2500 आरपीएमची 'बेस्ट-इन-क्लास' टॉर्क वितरीत करते. 'सुवर्णकाळ' दरम्यान त्वरित प्रतिसादासाठी परिणामी वेग आणि 'बेस्ट-इन-क्लास' प्रवेग महत्त्वपूर्ण आहेत.

डी-मॅक्स रुग्णवाहिका वाहन मजबूत इसूझु आयग्रीप प्लॅटफॉर्मवर तयार केले गेले आहे, जे शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही रस्त्यांसाठी आदर्श असून ते कठीण आणि स्थिर बनवते. बेस्ट-इन-क्लास डबल विशबोनसह हाय-राइड सस्पेंशन जड वापरासाठी डिझाइन केलेली मजबूत एसयूव्ही सस्पेंशन प्रणाली प्रदान करते आणि सर्व प्रवाशांना उत्तम केबिन आराम उपलब्ध करते. लहान व्हील-बेस, उत्कृष्ट ग्राउंड क्लीअरन्स, ग्रेडेबिलिटी, मोठे टायर आणि लहान टर्निंग सर्कल रेडयस यासारख्या 'बेस्ट-इन-क्लास' वैशिष्ट्यांमुळे इसूझू डी-मॅक्स रुग्णवाहिका शहरी, निमशहरी आणि ग्रामीण भागात तगडा प्रवासाकरिता कार्यरत राहण्याच्या दृष्टीने अत्यंत कुशल बनते. ॲक्टिव्ह सेफ्टीबाबत बोलायचे झाल्यास यात एबीएस (अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम) आणि ईबीडी व्यतिरिक्त टीसीएस (ट्रॅक्शन कंट्रोल सिस्टम) ईएससी (इलेक्ट्रॉनिक स्टॅबिलिटी कंट्रोल) एचडीसी (हिल डिसेंट कंट्रोल) ईबीए (इमर्जन्सी ब्रेक असिस्ट) बीओएस (इंटेलिजेंट ब्रेक ओव्हर-राइड सिस्टम) यासारख्या अनेक बेस्ट-इन-क्लास फीचर्स देण्यात आले आहेत. निष्क्रीय सुरक्षेसाठी, यात पादचाऱ्यांसाठी अनुकूल फ्रंट फॅसिया, ड्रायव्हर आणि सह-ड्रायव्हर सीटमध्ये प्री-टेंशनर लोड लिमिटर्ससह 3-पॉइंट सीट बेल्ट, सीट बेल्ट वॉर्निंग सिस्टम, ड्रायव्हर आणि सह-ड्रायव्हरसाठी एअरबॅग, संकुचित स्टीयरिंग कॉलम आणि फ्रंट केबिनसाठी साइड इंट्रूजन प्रोटेक्शन बीम आहे.

जुळ्या कॉकपिट एर्गोनोमिक डिझाइनसह समोरील केबिन आणि समायोजित करण्यायोग्य हेडरेस्ट आणि वातानुकूलनसह उच्च-गुणवत्तेच्या फॅब्रिक शिलाईसह बकेट सीटच्या भोवती समोर गुंडाळल्याने चालक आणि सह-चालकाला प्रवासादरम्यान आरामदायी आणि थकवा-मुक्त प्रवास करता येतो.

## थोडक्यात



### ‘मॅटर’च्या वतीने 'एराथॉन भारत' मोहिमेला सुरुवात

**पुणे (आरंभ पर्व) :** भारतातील आघाडीची इलेक्ट्रिक मोबिलिटी कंपनी मॅटर ग्रुपने स्टॅच्यू ऑफ युनिटीवरून अधिकृतपणे आपल्या मिशन एराथॉन भारत' या मोहिमेची सुरुवात केली. हवामानातील आव्हानांबद्दल जागरुकता निर्माण करून आणि शाश्वत गतिशीलतेकडे परिवर्तन घडवून आणून भारतातील लोकांना एकत्र आणणे हे या मिशनचे उद्दिष्ट आहे. 25 राज्यांमधील अनोळखी मार्गांनी इलेक्ट्रिक मोटारबाईकच्या सहाय्याने जाणारा हा एक विलक्षण प्रवास असणार आहे. मॅटर नीती आयोगाच्या शून्य प्रदूषण गतिशीलता मोहिमेचा भागीदार आहे. मॅटरमध्ये, जीवाश्म इंधनापासून शाश्वत ऊर्जा आणि गतिशीलतेच्या पर्यायांपर्यंत संक्रमणासाठी उत्प्रेरक बनण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. पृथ्वीचे जतन करताना आणि बिनशर्त विद्युत मोटारसायकल वितरीत करताना जीवन समृद्ध करणारी वाहतूक उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. दररोजच्या प्रवासासाठी असो किंवा नवीन क्षितीजांमधील साहसांसाठी, प्रत्येक प्रवासामुळे स्वातंत्र्याची भावना निर्माण झाली पाहिजे, असे मॅटरच्या संस्थापकांसह कंपनीच्या टीमने सांगितले. 'एराथॉन भारत' हे उत्सर्जन न करण्याच्या दिशेने मॅटरची महत्वाकांक्षी मोहीम आहे. किनारपट्टीवरील मैदाने आणि खडकाळ पर्वतांपासून ते गजबजलेली शहरे आणि शांत गावांपर्यंत भारताच्या वैविध्यपूर्ण भूप्रदेशातून प्रवास करून 25 राज्यांमधील 25,000 किलोमीटरचा हा विलक्षण प्रवास असणार आहे.



### अनाथ, वंचित व वृद्धांनी लुटला दांडिया, भोंडल्याचा आनंद

**पुणे (आरंभ पर्व) :** अनाथाश्रम, वंचित घटकांतील मुले-मुली व वृद्धाश्रमातील आजी-आजोबांची खास दांडिया व महाभोंडल्याचे आयोजन केले होते. दुर्गा अष्टमीनिमित्त युवा फिनिक्स सोसायटी ट्रस्ट, वंदे मातरम् संघटना, आदर्श मित्र मंडळ, युवा वाद्य पथक यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम झाला. तसेच वस्ती विभागातील मुलामुलींना शिष्यवृत्ती, शैक्षणिक साहित्याचे, तसेच बचपन बचाव समितीतील अनाथ मुलींना लाकडी खेळण्यांचे वाटप करण्यात आले. उपक्रमाचे यंदा 16 वे वर्षे होते. प्रसंगी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. अशोक पलांडे व डायमंड वॉच कंपनीचे संचालक संजीव फडतरे, वंदे मातरम् संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष सचिन जामगे, पुणे शहर कार्याध्यक्ष संतोष देवकर, वरिष्ठ उपाध्यक्ष सुरज जाधव, मार्केटयार्ड कामगार युनियन अध्यक्ष नितीन जामगे, ॲड. मनीष पाडेकर व अनिश पाडेकर उपस्थित होते. अमोल भुरेवाल, आदित्य मुगळे, किरण केकाने, तुषार गिरी, गिरीश धुमाळ, ओम जामगे यांनी केले कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन केले.

### अयोध्येत महाराष्ट्र भक्त सदन लवकरच उभे राहणार

**पुणे (आरंभ पर्व) :** लोकसभा निवडणुकांपूर्वी म्हणजेच जानेवारी 2024 मध्ये केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाजप सरकारच्या कार्यकाळात गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेले भव्य-दिव्य राम मंदिर उभारल्यानंतर देशभरातून भाविक व राम भक्तांनी अयोध्येत दर्शनासाठी गर्दी केली होती. तर, महाराष्ट्रातूनही भाविक मोठ्या प्रमाणात अयोध्येला रामललाच्या दर्शनासाठी गेले होते. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मंत्र्यांसह रामललाचे दर्शन घेतले होते त्यावेळी अयोध्येत महाराष्ट्र भक्त सदन बांधण्याची घोषणा त्यांनी केली होती. त्यानंतर अयोध्येत राम जन्मभूमी मंदिर परिसरात महाराष्ट्र भक्त सदन उभारण्यासाठी राज्य शासनाने जूनमध्ये जमीनही खरेदी केली होती.

# प्रोफेसर बिमल रॉय यांचे स्किल गेम्स फ्रेमवर्क

- ऑनलाइन रिअल मनी गेम्ससाठी भारतातील पहिले परिमाणात्मक फ्रेमवर्क सुरू करण्यात आले

**पुणे (दै. आरंभ पर्व)** वैज्ञानिक आणि डेटा आधारित पद्धतीद्वारे, ऑनलाइन गेमचे कौशल्य-आधारित म्हणून वर्गीकरण करण्याचा भारताचा पहिला सर्वसमावेशक दृष्टीकोन, द स्किल गेम्स फ्रेमवर्क, "अनुमत ऑनलाइन रिअल मनी गेम्स निश्चित करण्यासाठी एक समर्पित असे फ्रेमवर्क" म्हणून सुरु करण्यात आला आहे. प्रसिद्ध सांख्यिकीशास्त्रज्ञ पद्मश्री प्रोफेसर (डॉ.) बिमल रॉय यांनी द डायलॉगच्या सहकार्याने विकसित केलेले हे फ्रेमवर्क देशातील तेजीच्या ऑनलाइन गेमिंग मार्केटचे नियमन करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हा ऐतिहासिक उपक्रम उद्योग तज्ञ, गेम डेव्हलपर, कायदेशीर सल्लागार, गेमर यांचा व्यापक सहभाग आणि सल्लामसलत करण्याचे फलित आहे, ज्याने हा फ्रेमवर्क एक सहयोगी प्रयत्न म्हणून उदयास आला आहे. द डायलॉगने प्रकाशित केलेला अहवाल या फ्रेमवर्कची पहिली आवृत्ती आहे, जी उद्योग, सरकार आणि गेमिंग उद्योगातील उदयोन्मुख ट्रेंडच्या फीडबॅकवर आधारित सतत विकसित होत राहावे यासाठी योजना आखते.

# समृद्ध जीवनासाठी वाचन आवश्यक

**प्रा. अनिल कुलकर्णी**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)** वाचनामुळे बुद्धीचा, अनुभवाचा आवाका वाढतो. ज्ञान व माहिती मिळते. वैचारिकता, संवेदनशीलता, भाषासमृद्धी, कल्पनाशक्तीचा विकास होतो. म्हणून समृद्ध जीवन जगायचे असेल तर वाचन आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रा.अनिल कुलकर्णी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील उपस्थित होते.

प्रा. अनिल कुलकर्णी पुढे म्हणाले की वाचनामुळे मूल्यविचार रुजतो. आपण अंतर्मुख होतो. आपल्या जाणीवा प्रगल्भ होतात. संवेदनशीलता जपता येते. विद्यार्थ्यांनी कथा-कवितेच्या माध्यमातून व्यक्त व्हावे. अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक अवांतर वाचनातून आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्याचे आवाहन केले. गायत्री कौदरे या विद्यार्थिनीचे डॉ.अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली.

वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाने विश्वास नांगरे पाटील यांच्या 'मन मे है विश्वास' या पुस्तकाचे अभिवाचन, काव्यवाचन, चर्चासत्र आदी उपक्रमांचे आयोजन केले. ग्रंथालय विभागाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

प्रणव तिमुणे, वैष्णवी शिंदे, प्रिया भालसिंगे, सानिका सुकाळे, अस्मिता शिंदे, तेजस्विनी सोनवणे या विद्यार्थ्यांनी उपक्रमात सहभाग घेतला. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे, सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे आणि आभार प्रा. रौनक भिसे यांनी मानले.

# आगामी सीरीज ‘फिसद्दी’चा ट्रेलर प्रदर्शित




**मुंबई (दै. आरंभ पर्व)** ॲमेझॉन एमएक्स प्लेयर ही ॲमेझॉनची मोफत व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा भावंडांमधल्या नात्याची परीक्षा पाहाणारी कथा त्यांच्या आगामी फिसद्दी या सीरीजमधून मांडणार आहे. या सीरीजचा भावस्पर्शी ट्रेलर नुकताच प्रदर्शित करण्यात आला. दोन भावंडांमधल्या नाजूक नात्याची ही कहाणी एकमेकांसोबत मोठं होण्याचं कटू वास्तव मांडणारी आहे. अलाहाबादच्या पार्श्वभूमीवर कॉलेजच्या दिवसात घडणाऱ्या फिसद्दीमध्ये गोल्डी आणि विमल या भावांची कथा पाहायला मिळणार आहे. गोल्डी कॉलेजमध्ये आख्यायिका बनून राहिलेला, लोकप्रिय मुलगा असतो, तर त्याचा भाऊ विमलला गोल्डीसारखंच बनायचं असतं. भावाभावांच्या नात्यामधले चढ-उतार या सीरीजमध्ये दाखवण्यात आले आहेत. भुवन अरोरा, पूजन छाब्रा, प्रियल महाजन, राजेश जैस, गोपाल दत्त, शबनम वधेरा, शैलजा चतुर्वेदी आणि मुकुंद पाल हे कलाकार यात प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.

ट्रेलरमध्ये भावांचं जवळचं नातं तसंच त्यांच्या भूमिका बदलायला सुरुवात झाल्यानंतर येणारा छुपा तणाव दाखवण्यात आला आहे.

गोल्डीला मोठंपण निभावणं अवघड जायला लागतं. तो जिथे कमी पडतो, जिथे विमल चमकतो आणि हीच गोष्ट स्विकारणं त्याला जड जातं.

एकेकाळी सर्वांचा लाडका असलेला, हुशार, आत्मविश्वासपूर्ण म्हणून ओळखला जाणारा गोल्डी स्वतःच्याच गोष्टीत परका होतो. या सीरीजमध्ये कशाप्रकारे भाऊ एकमेकांचे शत्रू आणि तरीही संरक्षक कसे असू शकतात, तुम्ही स्वतःसाठी तयार केलेली प्रतिमा मोठं होताना कशी सोडून द्यावी लागते हे पाहायला मिळणार आहे. विमलचं यश वाढतं, तसं गोल्डीची त्याच्या आयुष्यावरची पकड निसटायला लागते. त्यांचं नातं टोकाला पोहोचतं आणि त्यांच्या नात्याची अनपेक्षित पद्धतीनं परीक्षा घेतली जाते.

ॲमेझॉन एमएक्स प्लेयर कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, ‘फिसद्दीमध्ये भावाभावांचं नातं आपल्याशी सुसंगत आणि मनोरंजक पद्धतीने मांडण्यात आलं आहे. या सीरीजमध्ये शत्रुत्व, प्रेम, वैयक्तिक विकास हे सगळं आणि तरुणाईची झिंग दाखवण्यात आली आहे. या सीरीजची गोष्ट एरवी फारशा न मांडल्या जाणाऱ्या भावनेचा आढावा घेणारी असून प्रेक्षकांना ती आपलीशी वाटेल असा विश्वास वाटतो.’

या सीरीजमध्ये गोल्डीची व्यक्तीरेखा साकारणारे भुवन अरोरा यांनी अभिनेता म्हणून या सीरीजचा प्रवास अनोखा असल्याचं सांगितलं. या व्यक्तीरेखेमध्ये असलेले दोष आपलेसे वाटणारे आहेत आणि प्रेक्षकांना गोल्डी व विमलमध्ये त्यांचेही काही पैलू सापडतील असं अरोरा म्हणाले. त्यांच्या नात्यात भावंडांमधलं प्रेम, त्यांच्यावर असलेला तणाव, ईर्षा आणि आपलं अस्तित्व जपण्याचा ताण या सीरीजमध्ये पाहायला मिळेल. या कथेत दाखवण्यात आलेला ब्रोमान्स महत्त्वाचा घटक असून आतापर्यंत या नात्याविषयी फारसं काही पाहायला मिळालेलं नाही. मला आशा आहे, की प्रेक्षकांना या भावांचा प्रवास प्रेरणादायी वाटेल, कारण शेवटी कोणतंही नातंच आपण काय आहोत हे ठरवत असतं.




# समाजहितैषी प्रतापरावांचे योगदान अतुलनीय, दिशादर्शक

## डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे प्रतिपादन; सामाजिक संस्थांच्या वतीने प्रतापराव पवार यांचा कृतज्ञता सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)** "पैशांची देणगी महत्वाची असतेच; पण त्यापेक्षाही वैचारिक, अनुभवाची देणगी अधिक मोलाची असते. समाजहित, दातृत्वाच्या भावनेने कार्यरत प्रतापराव पवार यांचे योगदान अतुलनीय व दिशादर्शक आहे. तंत्रज्ञानाचा सदुपयोग, वेळेचे महत्व आणि सामाजिक जाण असलेले व्यक्तिमत्व प्रेरणादायी आहे," असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले.



समाजहितैषी उद्योजक प्रतापराव पवार यांचा विविध सामाजिक संस्थांच्या वतीने डॉ. माशेलकर यांच्या हस्ते कृतज्ञता सन्मान करण्यात आला. विद्यार्थी साहाय्यक समितीच्या पुढाकारातून मराठवाडा मित्र मंडळ, ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती, स्व-रूपवर्धिनी, महाराष्ट्र मेडिकल फाउंडेशन, बाएफ, बालग्राम, बालकल्याण, वनस्थळी, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडियन न्यूजपेपर सोसायटी, पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट, गर्जे मराठी ग्लोबल, ‘अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पुणे अंधशाळा, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग आदी संस्थांतर्फे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सन्मान सोहळ्याप्रसंगी या सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि पुणेकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. रघुनाथ माशेलकर म्हणाले, ‘‘पवार यांचे व्यक्तिमत्व बहुआयामी, समृद्ध व संपन्न आहे.

त्यांच्याकडे सखोल तांत्रिक ज्ञान, आधुनिक व्यवस्थापन कौशल्य, सामाजिक भान आहे. समाजातील वंचित घटकाविषयी संवेदना, स्वच्छ विचार आणि त्याला कृतिशीलतेची जोड देत पवार यांनी विविधांगी कार्य केले. त्यांनी आपल्या अनुभवाचे दान अनेक संस्थांना दिले, ते फार मोठे आहे. गेल्या 47 वर्षांपासून त्यांचे हे काम पाहण्याचे भाग्य मला लाभत आहे.’’

सन्मानाला उत्तर देताना प्रतापराव पवार म्हणाले, "माझी आई, शाळेतील शिक्षक यांच्यासह अनेकांचे माझ्यावर संस्कार आहेत. आजचा हा पुरस्कार मी कुटुंबीय, आयुष्यात भेटलेली अनेक मोठी माणसे आणि विविध संस्थांमधील सहकारी यांना अर्पण करतो. माझे पुढील आयुष्य समाजासाठीच असेन."

# सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला इंडियन इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कच्या क्रमवारीत महाराष्ट्रात तिसरे, पश्चिम विभागात पाचवे, तर देशात 32 वे स्थान




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला इंडियन इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कतर्फे (आयआयआरएफ) 2024 करीता जाहीर केलेल्या क्रमवारीत महाराष्ट्रात तिसरे, पश्चिम विभागात पाचवे, तर देशात 32 वे स्थान मिळाले आहे. 'आयआयआरएफ'तर्फे नुकतीच देशातील फिजिओथेरपी कॉलेजांची क्रमवारी एज्युकेशन पोस्ट मॅगझीनमध्ये जाहीर करण्यात आली.

'आयआयआरएफ'ची क्रमवारी ही तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्फत विश्लेषण करून अधिकृत व वैविध्यपूर्ण अशा पद्धतीने जाहीर होते, जी उद्योग जगताकडूनही स्वीकारली जाते. रोजगार, अध्यापन-अध्ययन व स्त्रोत, संशोधन, औद्योगिक उत्पन्न व एकीकरण, प्लेसमेंट धोरण व सहकार्य, भविष्यवेधी मार्गदर्शन आणि बाह्यधारणा व आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन या सात मुद्यांवर सर्वेक्षण करून ही क्रमवारी तयार केली जाते. सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स ही आरोग्य व संबंधित क्षेत्रातील नामवंत शिक्षणसंस्था आहे. उत्साही विद्यार्थ्यांची या क्षेत्रातील स्वप्ने पूर्ण व्हावीत आणि त्यांना एक चांगले करिअर घडविता यावे, यासाठी प्रयत्नशील अशी संस्था आहे.

सूर्यदत्त कॉलेज ऑफ फिजिओथेरपीतर्फे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्नित बॅचलर ऑफ फिजिओथेरपी हा पूर्णवेळ, तर महाराष्ट्र स्टेट बोर्ड व्होकेशनल एज्युकेशन एक्झाम (एमएसबीव्हीईई) संलग्नित फिजिओथेरपी पदविका, नॅचरोथेरपी पदविका, नर्सिंग केअर प्रमाणपत्र अभ्यासक्रम, डेंटल असिस्टंट, ऑप्थाल्मिक टेक्निशियन हे अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जातात. तंत्रज्ञानाभिमुख, सर्वांगीण विकासाचे शिक्षण देणारे गुणवत्तापूर्ण केंद्र म्हणून पुढे येण्याचा सूर्यदत्तचा उद्देश आहे. संशोधन, ज्ञान, प्रशिक्षण देऊन आरोग्य क्षेत्राला एक नवा आयाम देण्याचा आमचा प्रयत्न आहे. समाजाचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी फिजिओथेरपी मधील चांगले डॉक्टर तयार करण्यासाठी सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स काम करत आहे. समाजाला उपयुक्त असे मनुष्यबळ विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन उपलब्ध केले जाते.

आरोग्य विज्ञानाशी संबंधित सर्व पायाभूत अत्याधुनिक सुविधा येथे उपलब्ध आहेत. पुण्यातील विविध मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल्सबरोबर सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातून विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक व क्लिनिकल अनुभव देण्याचा प्रयत्न केला जातो. फिजिओथेरपी आणि संबंधित क्षेत्रातील विशेष क्षेत्रात पुरेसा अनुभव असलेल्या प्राध्यापकांच्या तज्ञ मार्गदर्शनाखाली या रुग्णालयांमध्ये क्लिनिकल प्रशिक्षण दिले जाते. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या आरोग्य विज्ञान क्षेत्रात असलेल्या उत्सुकतेमुळे हे होत आहे, असे प्राचार्या डॉ. सीमी रेठरेकर यांनी नमूद केले.

सूर्यदत्त संस्था सातत्याने विविध शिबिरांचे आयोजन करून सामाजिक आरोग्यासाठी कार्यरत असते. ज्यामध्ये रक्तदान, ऑस्टिओपथी, न्यूट्रिशन व डायटिक्स, पॅरामेडिकल, ऍक्युप्रेशर, कोअर फिजिओ आदींचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली स्नायुमज्जातंतुविज्ञान, न्यूरोलॉजिकल स्थिती, बालरोग आणि पुनर्वसन यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये फिजिओथेरपी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाते. हे शैक्षणिक-सामाजिक उपक्रम विद्यार्थ्यांना समाजाशी जोडण्यात उपयोगी ठरतात. त्यामुळे त्यांना शैक्षणिक प्रगतीसह सामाजिक भान आणि आरोग्यविषयक अनुभव संपन्नता मिळते. ज्यामुळे समाजावर त्यांचा सकारात्मक परिणाम होतो.

कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या या यशाबद्दल प्रा. डॉ. संजय चोरडिया यांनी आनंद व्यक्त केला. ही क्रमवारी आमचा उत्साह वाढवणारी आणि सूर्यदत्तमध्ये दिल्या जाणाऱ्या मूल्याधिष्ठित शिक्षणाचा गौरव करणारी आहे. विद्यार्थी व येथील तज्ज्ञ प्राध्यापकांच्या ज्ञानात भर घालण्यात, प्रोत्साहन देण्यात आणि संलग्नित दवाखाने आणि गरजू रुग्णांना जोडून चांगली सेवा देण्यास पूरक ठरतील. इन्स्टिट्यूट मार्फत मूल्यवर्धित प्रमाणपत्र अभ्यासक्रम देण्यात येतो, जेणेकरून त्यांची सर्वांगीण प्रगती होण्यास एकविसाव्या शतकातील व्यवस्थापकीय नेतृत्व, तात्विक कामगिरी आणि तंत्रकुशल व्यक्तिमत्व घडण्यास मदत होऊन रोजगारक्षम व व्यावसायिक प्रगती चांगली होईल, अशी भावना प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी व्यक्त केली.

सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सच्या वतीने दिव्यांग पुनर्वसन केंद्र आणि भारत विकास परिषद यांच्या सहकार्याने दिव्यांगासाठी कृत्रिम हात, पाय व कॅलिपर्स वितरण शिबिराचे आयोजन केले जाते. शिक्षण आणि सामाजिक उपक्रमांत उल्लेखनीय कार्याबद्दल आजवर सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सला अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

### विशेष बाब अशी की...

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया आरोग्य विज्ञानाबद्दल आकर्षण असल्याने त्यांनी गुडघेदुखीच्या रुग्णांसाठी १९८३ मध्ये (पदवी पूर्ण केल्यानंतर) 'नी क्वाड्रिसेप्स अँड नी जॉईंट एक्सरसायझर'चा शोध लावला. गुडघ्याच्या शास्त्रक्रिये आधी व नंतर यामध्ये याचा उपयोग झाला. पुण्यातील ससून रुग्णालयाला ते हस्तांतरित केले. या उपकरणाचा वापर गुडघ्याची ताकद वाढविण्यात झाला. या शोधासाठी तत्कालीन सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

## थोडक्यात



### निळकंठेश्वर भक्तनिवासाचे कामाचे भूमिपूजन संपन्न

**पुणे (आरंभ पर्व) :** खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार भिमराव आण्णा तापकीर यांच्या विकास निधीतून जांभळी डोंगरातील डावजे येथील श्री. नि[illegible]कंठेश्वर गड येथे एक कोटी रुपये निधीच्या भक्त निवासाचे भुमी पुजन मंत्रोच्चार वैदिक पद्धतीने पार पडले. ट्रस्टचे अध्यक्ष शिवदासजी सर्जे,राधेश्याम शर्मा,भाजपा ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे, एड. नरसिंग लगड यांचे हस्ते भूमीपूजन झाले .यावेळी मानकर पाटील, माउली तावरे, ओम सर्जे ,भास्कर साठे, मनोज देशमुख, राजेंद्र आगलावे,संदीप रेणूसे, रमेश खंडाळे, कुंडलीक चौधरी, गोरख मेंगळे, दीक्षित,गाडे , इत्यादी उपस्थित होते. यावेळी राधेश्याम शर्मा यांनी आमदार भीमराव तापकीर यांच्या कामाचे कौतुक व्यक्त केले. भक्तांच्या भक्तनिवासाची सोय केल्याबद्दल आभार मानले. खडकवासला भाजपचे ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे यांनी आ. भीमराव अण्णा तापकीर यांनी ग्रामीण भागातील प्रत्येक कामासाठी प्राधान्य क्रमाने निधी दिला आहे. निळकंठेश्वर मंदिराच्या कामासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला त्यामुळे हे भूमिपूजन पार पडत आहे. लवकरच कामाला सुरुवात होणार आहे. असे तागुंदे यांनी पुढे बोलताना सांगितले.

### सीएसआर आणि समुदाय प्रभाव प्रयत्नांना माइंडस्पेस REIT चे पाठबळ

**मुंबई (आरंभ पर्व) :** माइंडस्पेस बिझनेस पार्क्स REIT (BSE: 543217 | NSE: MINDSPACE) ('Mindspace REIT'), भारतातील चार प्रमुख कार्यालयीन बाजारपेठांमध्ये स्थित दर्जेदार ऑफिस निर्मिती करणारे मालक आणि विकासक आपल्या कामातून सीएसआर आणि समुदायाच्या प्रयत्नांना बळकटी देतात. पुण्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृहात पायाभूत सुविधांच्या वाढीसाठी ते प्रयत्नशील आहेत. या उपक्रमात कर्मचारी आणि तुरुंगातील 6,500 कैदी अशा दोघांसाठी आवश्यक पायाभूत सुविधांच्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने पुढील गोष्टी विकसित करण्यात येणार आहेत. सुधारित वैद्यकीय सेवेसाठी पूर्ण सुसज्ज प्राथमिक आरोग्य केंद्र, पिण्याच्या स्वच्छ पाण्यासाठी फिल्टरेशन प्रणालीसह पाण्याची साठवण टाकी, पुरुष आणि महिला कर्मचारी सदस्यांसाठी चेंजिंग रूम्स आणि विश्रांती कक्ष, स्वच्छतेसाठी नवीन शौचालये, आणि आपत्कालीन प्रतिसाद क्षमता मजबूत करण्यासाठी 24x7 रुग्णवाहिका तुरुंगातील कर्मचारी आणि कैदी या दोघांच्याही मूलभूत गरजा पूर्ण करत समाजात बदल घडवण्यासाठी माइंडस्पेस REIT चे समर्पण प्रतिबिंबित करते.




### मास्टरकार्डने पुणे येथे अत्याधुनिक टेक हबचे केले उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मास्टरकार्डने आज पुण्यात नवीन अत्याधुनिक टेक हबचे उद्घाटन जाहीर केले, जे भारतातील कंपनीच्या वाढीस पाठिंबा देईल आणि जागतिक स्तरावर तंत्रज्ञानाच्या प्रगतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. सुमारे अर्धा मिलियन चौरस मीटरमध्ये पसरलेला पुण्यातील हा कॅम्पस मास्टरकार्डच्या जागतिक टेक हब इकोसिस्टममधील नवीनतम जोड आहे, ज्यामध्ये आर्लिंग्टन, डब्लिन, न्यूयॉर्क, पुणे, सेंट लुईस, सिडनी आणि वॅनकूवर या सात ठिकाणांचा समावेश आहे. येरवडा, पुण्यातील ब्लूग्रास बिझनेस पार्कमध्ये स्थित, हा टेक हब 6,000 पेक्षा जास्त तंत्रज्ञ, अभियंते आणि विविध पार्श्वभूमी आणि शिस्तीतील तज्ञांना समाविष्ट करेल, ज्यामध्ये सॉफ्टवेअर विकासापासून वित्त, डेटा आर्किटेक्चरपासून सायबरसुरक्षा यापर्यंतच्या क्षेत्रांचा समावेश आहे. हे मास्टरकार्डचे जागतिक स्तरावर एका शहरातील सर्वात मोठे कर्मचारी केंद्र असेल. भारतामध्ये चार दशकांहून अधिक काळापासून मास्टरकार्डचा ठसा आहे, आणि आज मास्टरकार्ड देशातील एक समृद्ध पेमेंट्स इकोसिस्टमच्या केंद्रस्थानी कार्यरत आहे.

### आशिष गार्डन बँक्वेट हॉलचे विविध मान्यवरांचे उपस्थितीत भव्य उद्घाटन पुण्यात संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील कोथरूड येथील डी पी.रस्त्यावरील आशिष गार्डन बँक्वेट हॉल या भव्य सभागृहाचे उद्घाटन प्रसिद्ध क्रीडा पत्रकार व स्तंभलेखक सुनंदन लेले यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी आशिष गार्डन बँक्वेट हॉलचे संचालक दामोदर कुंबरे ,आशिष कुंबरे ,आरती कुंबरे, केटरिंग पार्टनर अंतूरकर केटरर्सचे पुष्कर अंतूरकर, इव्हेंट पार्टनर बी. आर . कॉसमॉस प्रायव्हेट लिमिटेडच्या संचालिका पल्लवी भट, घे भरारी च्या संचालिका नीलम ऐदलाबादकर व संचालक राहुल कुलकर्णी, ब्राह्मण ऑर्गनायझेशन फॉर नेटिव्ह डेव्हलपमेंट म्हणजेच बाँडच्या संचालिका मिथिला बेडसुर व समीर चितापुरे आदी मान्यवर उपस्थित होते.



आपल्या भाषणात सुनंदन लेले म्हणाले की "कोथरूड सारख्या ठिकाणी अशा हॉलची आवश्यकता होती व अशा ठिकाणी माझे बरेच कार्यक्रम झाले आहेत.कोथरूडकर व पुणेकरांना सर्व सोयींनी युक्त असे हे आशिष गार्डन बँक्वेट हॉल अतिशय योग्य असून आपल्या समारंभासाठी नक्कीच प्रत्येकाने येथे भेट दिली पाहिजे." या कोथरुड येथील भव्य प्रशस्त आशिष गार्डन बँक्वेट हॉलमध्ये विवाहासाठी सभागृह व केटरिंग, राजकीय सभा, वाढदिवस, मुंज, लग्नाचा वाढदिवस, विविध सामाजिक कार्यक्रम अशा विविध समारंभासाठी आशिष बँक्वेट हॉलमध्ये सोयी सुविधा असणार आहेत. तसेच ज्येष्ठ नागरिक व लग्नासाठी आकर्षक पॅकेजही या हॉलमध्ये असणार आहेत . या हॉलमध्ये प्रशस्त अशी पार्किंगची सोय करण्यात आली आहे.आशिष बँक्वेट हॉल गेल्या 25 वर्षापासून कोथरुड येथे उभारण्यात आला आहे. त्याचे नुकतेच नूतनीकरण करण्यात आले आहे. एसी सुविधा सह पूर्णपणे प्रशस्त असा सुसज्ज असा हॉल सर्व कार्यक्रमासाठी आता सज्ज झाला आहे.त्यामुळे पुणेकर नागरिकांनी नक्की या आशिष बँक्वेट हॉलला नक्की भेट द्यावी असे आवाहन आशिष बँक्वेट हॉल व्यवस्थापनाकडून करण्यात आले आहे.

# तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाची पुन्हा एकदा गरज आहे

## पक्षाची ताकद आपल्या पाठीशी आहे : विधानसभा लढणार व जिंकणार सुध्दा : नातेगोती स्नेह मेळाव्यात सचिन दोडके यांचे आवाहन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लहानपणीच वडीलवारल्यामुळे पोरका झालेलो मी आपल्या सर्वांच्या साथीने आज विधानसभेपर्यंत पोहोचू शकलो. आपली ही ताकद अशीच आपली पाठीशी राहू द्या.

आगामी विधानसभा निवडणूक नक्की जिंकू असा आत्मविश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे इच्छुक उमेदवार माजी नगरसेवक सचिन दोडके यांनी व्यक्त केला आहे.

चांदणी चौक येथील नातेगोते स्नेह मेळावा स्नेह भोजनाच्या आयोजन दोडके परिवाराच्या वतीने करण्यात आले होते. त्यावेळी दोडके यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या...

लहानपणापासून आपल्या सर्वांच्या साथीने संघर्षमय परिस्थितीतून सावरत आज संध्याकाळ आपली ओळख तुमच्या प्रेमामुळे महाराष्ट्र भर पसरली आहे.



अत्यंत खडतर परिस्थितीमध्ये आईसोबत हा प्रवास सुरू ठेवला आहे. बिन बापाचा पोरगा म्हणून सर्वांनी लहानपणापासून प्रेम आमच्यावर केल. त्या प्रेमापोटी नगरसेवक ते आज विधानसभेच्या रणांगणापर्यंत आपणं सर्वांनी साथ दिली.

आज वडील असते तर त्यांना ही अभिमान नक्की वाटला असता मात्र ही जनताच माझी माय बाप म्हणून आपण आगामी विधानसभेसाठी सज्ज व्हायचे आहे..

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील आदरणीय शरदचंद्र पवार साहेबांच्या विचारांचा मतदार हा खडकवासला विधानसभेमध्ये परिवर्तन नक्की करणार आहे.

यावेळी उपस्थित स्नेहजनांनी आपण सर्वजण एकत्रितपणे सचिन दोडके यांना विधानसभेसाठी सहकार्य करण्याचा निर्धार करून एकमुखी पाठिंबा दर्शवला...

या स्नेहमेळाव्यासाठी काशिनाथ मोरे ,बाळासाहेब जाधव, भाऊसाहेब जाधव ,विकास लगड, सुभाष पोकळे, अनिता ताई इंगळे ,ताराबाई नानगुडे, अतुल कारले ,राहुल वांजळे, ज्ञानेश्वर वांजळे आबासाहेब दोडके, तात्या भिंताडे ,राजेंद्र उबे, बाळासाहेब पौळ व हजारो स्नेही उपस्थित होते.

### पक्षाचे प्रेम आपल्यावर नक्कीच आहे

2019 साली लोकसभा निवडणुकीत खडकवासला मतदारसंघातून 65 हजार मायनस असताना पक्षाने उमेदवारी दिली. आणि शेवटच्या फेरीमध्ये आपला पराभव झाला. त्यावेळी आदरणीय शरदचंद्र पवार साहेबांनी कौतुक करत ६५ हजारांच मताधिक्य कमी केले कसे असा प्रश्न विचारत कौतुक केले. निवडणूक हरूनही जनतेनं जे प्रेम केलं ते खूप अनमोल होते. येथूनच लढण्याची प्रेरणा मिळते.मागील लोकसभा निवडणुकीच्या वेळेस खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या एबी फॉर्म ला सचिन दोडकेचां पूरक उमेदवार म्हणून फॉर्म भरण्यात आला. पक्षाचा आपल्यावर खूप विश्वास आहे. विधानसभा निवडणूक लढाईची व जिंकायची हा निर्धार आपण करूया.. असे यावेळी दोडके यांनी सांगितले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.